## निशानी क्रमांक ५ खाली आदेश

(दिनांक २९/०८/२०२२ रोजी पारीत)

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आज्ञा ३९ नियम १ व २ अन्वये तात्पुरता मनाई हुकूम मिळणे करीता केला आहे.

०२. वादींचे असे कथन आहे की, मौजा येवला, ता. घनसावंगी, जि. जालना येथील शेतजमीन गट क्र.११४ मधील प्रतिवादी क्र.१ च्या नावे असलेली ०१ हे. ३० आर, शेतजमीन गट क्र.११५ मधील प्रतिवादी क्र.२ च्या नावे असलेली ०१ हे. २७ आर, मौजा बोररांजणी, ता. घनसावंगी, जि. जालना येथील शेतजमीन गट क्र.७४ मधील प्रतिवादी क्र.३ च्या नावे असलेली ०२ हे. ०४ आर, प्रतिवादी क्र.४ च्या नावे असलेली ०१ हे. ०२ आर व प्रतिवादी क्र.५ च्या नावे असलेली ०१ हे. ०० आर (येथून पुढे **दावा मिळकती** असे संबोधण्यात येईल) या वादी व प्रतिवादींच्या हिंदु एकत्र कुटुंबीयाची वडीलोपार्जीत अविभक्त मालमत्ता आहे. दावा मिळकतींची वाटणी होवुन स्वतंत्र ताबा मिळण्यासाठी मुळ दावा दाखल केला आहे.

०३. वादींनी असे कथन केले की, वादी व प्रतिवादी क्र.१ व ६ हे सावत्र भाऊ व बहिणी आहेत. प्रतिवादी क्र.२ ही प्रतिवादी क्र.१ ची पत्नी असुन प्रतिवादी क्र.३ व ४ हे प्रतिवादी क्र.१ ची मुले आहेत. प्रतिवादी क्र.५ ही प्रतिवादी क्र.४ ची पत्नी आहे. वादींची आई तान्हाबाई ही मयत किसनराव यांची पहिली पत्नी होती. प्रतिवादी क्र.१ व ६ यांची आई ही मयत किसनरावची दुसरी पत्नी होती.

०४. वादींनी कथन केले की, प्रतिवादी क्र.१ हा घरातील कर्ता पुरुष असल्यामुळे त्याच्या नावे ७/१२ उता–यामध्ये दावा मिळकतीच्या नोंदी कुटूंब व्यवस्थेकरीता घेण्यात आलेल्या आहेत. खाते फोड करायचे म्हणुन दावा मिळकतींपैकी काही जमीन आपली मुले व सुन यांच्या नावे प्रतिवादी क्र.१ ने केली होती. वादी व प्रतिवादींचे कुटूंब मोठे झाल्यामुळे छोट्यामोठ्या कारणावरुन वाद होत आहेत. दावा मिळकतींमध्ये वादींचा अविभक्त हिस्सा आहे. प्रतिवादी हे दावा मिळकती त्यांच्या नावावर नोंदी असल्याचा गैरफायदा घेवुन दावा मिळकती हस्तांतरीत करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादींनी दावा मिळकती कोणासही कोणत्याही मार्गे हस्तांतरीत करु नये, असा तात्पुरता मनाई हुकूम मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०५. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी निशाणी क्र.१९ प्रमाणे लेखी कैफीयत व मनाई हुकूम अर्जाचे उत्तर दाखल केले आहे. वादी व प्रतिवादींनी त्यांच्यातील नाते नाकारलेले नाही. दावा मिळकती संबंधातील ईतर मजकुर त्यांनी नाकारलेला आहे. वादी हे मयत किसनराव यांच्या दुस–या पत्नीची मुले असुन प्रतिवादी क्र.१ व ६ हे पहिल्या पत्नीची मुले आहेत. वादी हे मयत किसन यांचे कायदेशिर वारस होवु शकत नाही. दावा मिळकती वादी व प्रतिवादींच्या हिंदु एकत्र कुटूंबाची वडीलोपार्जीत मालमत्ता नाही. त्यामुळे वाटणी होण्याचा प्रश्नच नाही.

०६. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी कथन केले की, शेतजमीन गट क्र.११४ मधील ०३ हे. १० गुंठे जमीन प्रतिवादी क्र.१ ने विठ्ठल बाजीराव तांगडे यांच्याकडुन रुपये

२,०००/– मध्ये दिनांक ०३/११/१९८० रोजी नोंदणीकृत खरेदीखताआधारे विकत घेतली असुन त्यांची स्वकष्टार्जीत मालमत्ता आहे. त्याचप्रमाणे शेतजमीन गट क्र.११५ मधील शेतजमीन प्रतिवादी क्र.२ ची स्वकष्टार्जीत मालमत्ता आहे. सन १९८९ मध्ये ती जमीन वादी क्र.१ च्या नावे असल्यामुळे त्याने प्रतिवादी क्र.२ ला ती जमीन फेरफार क्र.८४ अन्वये वापस केली आहे. तेव्हापासुन त्यावर प्रतिवादी क्र.२ चा ताबा आहे.

०७. गट क्र.७४ मधील प्रतिवादी क्र.३, ४ व ५ च्या नावे असलेले क्षेत्राशी वादींचा संबंध नाही. त्या सर्व जमीनी प्रतिवादी क्र.१ ने किराणा दुकान चालवुन विकत घेतलेल्या आहेत. गट क्र.७४ मधील ०२ हे. ०२ आर एवढे क्षेत्र प्रतिवादी क्र.१ ने स्वता:च्या कमाईतुन लिंबाजी अन्नाभाऊ जाधव यांच्याकडुन रुपये १०,०००/– दिनांक २२/१०/१९९४ रोजी खरेदी घेतली आहे. गट क्र.७४ मधील प्रतिवादी क्र.१ च्या नावे ०१ हे. ०२ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.४ व ५ यांना वाटुन दिली आहे. त्याचप्रमाणे वादींना दावा दाखल करण्याचा व वाटणी मागण्याचा अधिकार नाही. म्हणुन अर्ज नामंजुर करावा, अशी विनंती त्यांनी केली.

०८. प्रतिवादी क्र.६ ने लेखी कैफीयत व मनाई हुकूम अर्जाचे उत्तर निशाणी क्र.२७ प्रमाणे दाखल केले आहे. वादीचा दावा तिने मान्य केला आहे. तिला आजपर्यंत कोणताही मोबदला मिळालेला नाही. म्हणुन दावा मंजुर करावा, अशी विनंती तिने केली.

०९. वादींतर्फे ॲड. श्री. डी. बी. शिवतारे, प्रतिवादी क्र.१ ते ५ तर्फे ॲड. श्री. आर. एस. देशमुख व प्रतिवादी क्र.६ तर्फे ॲड. श्री. जी. बी. गोरे यांचा युक्तीवाद ऐकला.

प्रतिवादी क्र.६ ने लेखी युक्तीवाद नि.क्र.२८ प्रमाणे दाखल केला आहे. वादींनी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. माझे विचारार्थ खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष कारणांसहित नमुद केलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | वादींच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे का ? | नाही. |
| ०२ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे का ? | नाही. |
| ०३ | मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर न केल्यास वादींचे न भरून येणारे नुकसान होणार आहे का ? | नाही. |
| ०४ | काय आदेश ? | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

१०. वादींनी नि.क्र.०४ च्या कागदपत्रांच्या यादीसोबत गट क्र.११४ चा ७/१२ उतारा व ८–अ उतारा, गट क्र.११५ चा ७/१२ उतारा व ८–अ उतारा, गट क्र.७४ चा ७/१२ उतारा व ८–अ उतारा, नि.क्र.२४ च्या कागदपत्रांच्या यादीसोबत गट क्र.७४ चा सन १९९९ ते २०१५ नोंद असलेला उतारा आणि एकत्रित केलेल्य जमीन दर्शविणा–या पत्रकाची प्रमाणीत प्रत, फेरफार क्र.१०६७, १३७९ च्या प्रमाणीत प्रती, गट क्र.११५ व ११४ चे सन १९९९ ते २०१५ नोंदी असलेले ७/१२ उतारे दाखल केले आहे. नि.क्र.३० च्या कागदपत्रांच्या यादीसोबत मौजा येवला येथील गट क्र.११८ चे दोन ७/१२ उतारे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ ने नि.क्र.२६ च्या कागदपत्रांच्या यादीसोबत खरेदीखत क्र.३७३८/१९८४ ची झेरॉक्स प्रत, खरेदीखत क्र.३७३७/१९८४ ची झेरॉक्स

प्रत व फेरफार क्र.८४ ची झेरॉक्स प्रत दाखल केले आहे.

११. मनाई हुकुमाचा अर्ज विचारात घेत असताना दाव्याच्या मुळ गुणदोषावर जाणे गरजेचे नसते. मनाई हुकूमाचा अर्ज विचारात घेत असतांना तीन मुद्दे महत्त्वाचे ठरतात. वादींच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे का, न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे का व मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर न केल्यास वादींचे न भरून येणारे नुकसान होणार आहे काय ? इत्यादी ठरविणे गरजेचे असते. त्यामुळे सद्यस्थितीत वादींनी व प्रतिवादी क्र.१ ते ५ ने दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ३ करीता</u> :-**

तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्र घेतलेले आहेत.

१२. वादींनी असे कथन केले की, दावा मिळकती त्यांच्या वडीलोपार्जीत असुन हिंदु एकत्र कुटूंबाच्या आहेत. वादींनी जे ७/१२ उतारे दाखल केले आहे, त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गट क्र.११४ चे क्षेत्र ०१ हे. ३० आर समोर प्रतिवादी क्र.१, गट क्र.११५ चे क्षेत्र ०१ हे. २७ आर समोर प्रतिवादी क्र.२ चे नाव, गट क्र.७४ मधील ०२ हे. ०४ आर एवढया क्षेत्रासमोर प्रतिवादी क्र.३, ०१ हे. ०२ आर समोर प्रतिवादी क्र.४ चे नाव व ०१ हे. ०० आर क्षेत्रासमोर प्रतिवादी क्र.५ चे नाव नमुद आहे.

१३. दावा मिळकतीपैकी एकाही ७/१२ उता-यावर वादींपैकी एकाचेही नाव नमुद नाही. फेरफार क्र.१०६७ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या नावासमोर अ.पा.क. म्हणुन प्रतिवादी क्र.१ चे नाव नमुद होते व ते कमी करण्यात

आले आहे. फेरफार क्र.१३७९ चे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्यमध्ये वाटणी होवुन तो फेर मंजुर झालेला आहे, असे दिसुन येत आहे.

१४. वादींनी गट क्र.११४ व ११५ चे सन १९९९ ते २०१५ नोंद दर्शविणारे ७/१२ उतारे दाखल केले आहेत, त्यावर देखील प्रतिवादी क्र.१ व २ यांचे नाव नमुद आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ ने खरेदीखत क्र.३७३८/१९८४ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता गट क्र.७४ मधील ०२ हे. ०२ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.४ ने अज्ञान असताना विकत घेतली आहे. अ.पा.क. म्हणुन प्रतिवादी क्र.१ चे नाव त्यावर नमुद आहे.

१५. प्रतिवादी क्र.१ ते ५ ने खरेदीखत क्र.३७३७/१९८४ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता गट क्र.७४ मधील ०२ हे. ०४ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.३ ने अज्ञान असताना विकत घेतली आहे. अ.पा.क. म्हणुन प्रतिवादी क्र.१ चे नाव त्यावर नमुद आहे. फेरफार क्र.८४ चे अवलोकन केले असता वादी क्र.१ ने गट क्र.११५ मधील ०१ हे. २५ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.२ च्या हक्कात वाटणीपत्राने करुन दिले, असे दिसुन येते.

१६. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ व ६ हे मयत किसन याच्या दुस–या पत्नीचे मुले आहेत व वादी हे पहिल्या पत्नीचे मुले आहेत. वादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती हिंदु एकत्र कुटूंबाची वडीलोपार्जीत मिळकत आहे. परंतु या दोन्ही बाबी दाव्यामध्ये पुरावा आल्यानंतर ठरविता येणे शक्य आहे.

१७. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी हे दावा मिळकती हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहे. प्रतिवादी कोणती दावा मिळकत कोणत्या मार्गाने कोणास हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहे, याबाबत वादींनी एकही दस्त दाखल केलेला नाही.

१८. वादींनी जे तोंडी कथन केले आहे, त्याची सत्यता अभिलेखावर पुरावा आल्यानंतर स्पष्ट होणार आहे. दावा मिळकती प्रतिवादी हे ईतर कोणासही हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहे, हे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल देखील वादींच्या बाजुने नाही. दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यावर एकाही वादीचे नाव नमुद नाही. त्यामुळे मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर न केल्यास वादींचे कुठलेही न भरुन येणारे नुकसान होण्याची शक्यता नाही. **म्हणून मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष नाही असे नोंदविले आहे.**

**मुद्दा क्रमांक ४ करीता** :-

१९. मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष विचारात घेता वादी हे मागणीप्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकुमास पात्र नाही. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**आदेश**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी व प्रतिवादींनी ज्याचा त्याचा खर्च सोसावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN BHAGVAT SHIRSATH
Date: 2022.08.30 16:14:51 +0530

**(स.भा.शिरसाठ)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घनसावंगी.

दिनांक : २९/०८/२०२२

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : ए. आर. गडदे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (क.स्तर), घनसावंगी

सही/-

लघुलेखक ग्रेड-३